नि.फौ.ख.क्र.१५८/२०२०
सरकार वि. निर्मला
नि.क्र. १६

<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी.</u>

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव – नंदु चिंधुजी लुटे
वय – ३५ वर्षे,धंदा – मजुरी
राहणार – ब्राम्हणी, तह.उमरेड

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.संदेश काठोके –</u>

पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. पोलीसांनी घटनास्थळ पंच म्हणून हजर राहण्यासाठी समंस दिला नव्हता. आता मला समंस व घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीती नाही. सहीस **नि.क्र.१७ व १८** देण्यात येते.

***(साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सरकारी वकील यांनी विरुध्द पक्षकार उलटतपासणीमध्ये जे कोणतेही प्रश्न विचारु शकेल ते प्रश्न आपल्या साक्षीदाराला विचारणीसाठी परवानगी मागितली– परवानगी देण्यात आली. )***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २६.०८.२०२० पोलीसांनी मला ब्राम्हणी पोस्ट ऑफीस येथे घटनास्थळी पंच म्हणून बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, ब्राम्हणी येथील पोस्ट ऑफीस हे रामदास सदाशिव अंबोले यांच्या घरात किरायाने आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या पोस्ट ऑफिसला लोखंडी शटर आहे. हे मला माहीत नाही की, त्या पोस्ट ऑफीसचे काम एक महिला पाहायची. हे

म्हणणे खरे आहे की, पोस्ट ऑफीसची इमारत ही विटा सिमेंटची पक्की इमारत आहे. हे म्हणणे खरे आहे की, या घटनास्थळाच्या पुर्वेला ताराबाई अंबोणे यांचे घर, पश्चिमेला भाऊराव अंबोणे व उत्तरेला भास्कर अंबोणे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दक्षिणेस गल्लीतील दहा फुट रुंदीचा सिमेंटचा रोड व त्या पलीकडे भुशण बंडु अंबोणे यांचे राहते घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री रघुते यांच्या तर्फे सुरु**

३. ब्राम्हणी हे माझे जन्म गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कोणत्या ठिकाणी कोणते ऑफीसआहे, याची पुर्ण माहीती मला सुरवाती पासूनच आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला असलेल्या माहीतीच्या आधाराव पोस्ट ऑफीस कुठे आहे, हे सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सह्या कुठे व कशासाठी घेतल्या हे मला माहीती नाही.

**फेरतपास काही नाही.**

**समक्ष,**

श्रवणोत्तर स्विकृत,

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : ०६.०१.२०२६

न्यायदंडाधिकरी प्रथम वर्ग,
उमरेड